# महाराष्ट्र शासन
# उच्च शिक्षण संचालनालय
## ४१२, ई बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६.

**Web:www dhepune.gov.in** **Mail: vishi.dhepune@nic.in**

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्रमांक - उशिसं/शिष्यवृत्ती/मु.मो.शि २५-२६/ दिनांक - /०६/२०२५

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे

**विषय - राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काचा ५० टक्केऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालय स्तरावर नोडल ऑफिसर नेमणेबाबत.**

**संदर्भ - १.** संचालनालयाचे पत्र क्रमांक उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमुशि/३८५२, दिनांक १९/७/२०२४
२. संचालनालयाचे पत्र क्रमांक उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमुशि/E-९७१००६, दिनांक ३/३/२०२५.

उपरोक्त विषयी शासन निर्णय दिनांक ८/७/२०२४ नुसार संदर्भिय पत्रान्वये सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत कळविण्यात आले होते. तसेच विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती अर्ज करणेसाठी मार्गदर्शन करण्यास कळविण्यात आले होते. तसेच विद्यार्थिनींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणा-या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे, असे कळविण्यात आले होते. तथापि, आपल्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांनी नोडल ऑफिसर नेमले असल्याबाबतची माहिती संचालनालयास अद्यापपर्यंत सादर केलेली नाही.

आपण महाविद्यालय स्तरावर नेमलेल्या नोडल अधिका-यांची माहिती देताना सेवेत असलेल्या अधिका-यांचीच माहिती देण्यात यावी. बदली झालेल्या, सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांच्याऐवजी नव्याने नियुक्त झालेल्या नोडल अधिका-यांची नांवे देण्यात यावीत.

तरी संदर्भिय पत्रान्वये आपण नेमलेल्या सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयाच्या नोडल अधिका-यांची माहिती खालील तक्त्यात सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | नोडल अधिका-याचे नांव | मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी |
|---|---|---|---|
| | | | |

उपरोक्त तक्त्यामधील माहिती आजच संचालनालयाच्या शिष्यवृत्ती शाखेच्या ई-मेलवर सादर करण्यात यावी.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 17-06-2025 19:14:39

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक , (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १६.